# प्रेसनोट

दि.०९/०६/२०१७ रोजी सौ.नयना जनार्दन बांदल, वय-२८ वर्षे, रा.केपी नगर, हरिविठ्ठल अपार्टमेंट, धनकवडी, पुणे या त्यांचे आई व दोन लहान मुली सोबत बाजीराव रोड, पुणे येथुन स्वारगेट येथे येण्यासाठी रिक्षा मध्ये बसल्या होत्या. त्यावेळी त्यांनी त्यांची स्वतः जवळ असलेली पर्स रिक्षाचे मागील बाजुस ठेवली होती. त्या स्वारगेट एस.टी. स्टॅण्ड येथे उतरल्या असता. त्यांना सोडुन रिक्षाचालक रिक्षा घेवुन निघुन गेल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की त्यांची पर्स ज्यामध्ये १० तोळे सोन्याचे दागिने, रोख रक्कम २०००/- व सॅमसंग कंपनीचा मोबाईल रिक्षा मध्ये विसरल्याचे नेहरु स्टेडीयम चौकी, स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे येथे येवुन कळविले. त्यावर चौकीचे पोलीस उप निरीक्षक श्री.बी. एस. गुरव व ड्युटी अंमलदार पोलीस नाईक ३११८ व्हि. पी. माने यांनी सौ नयना बांदल यांचे रिक्षा मध्ये विसरलेला मोबाईल नं.९८२३५२०४७० यावर संपर्क साधला असता, रिक्षा चालक नामे शकील अल्ताफ मुल्ला, रा.कोंढवा खुर्द, पुणे यांनी फोन उचलुन मी चौकीत येत आहे असे सांगितले. त्यानंतर रिक्षाचालक श्री.मुल्ला यांनी सदरची दागिने, पैसे व मोबाईल असलेली पर्स चौकीत घेवुन येवुन सौ.नयना बांदल यांना परत केली.

वरिल इसम श्री.शकील अल्ताफ मुल्ला रा.कोढवा खुर्द, पुणे यांनी दाखविलेल्या प्रामाणीकपणाबद्दल त्यांचा स्वारगेट पोलिस ठाणे येथे पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला आहे.


If you want to provide some confidential
on below phone no.